नियमित दिवाणी दावा क्र. 23/2016
युवराज चिल्लरगे वि. अमोल खताळ वगैरे

## आदेश नि.क. 19 वर

दावा मिळकत वर प्रतिवादी क्र. 2 व 3 यांना पश्चिम दिशेने बांध फोडून अतिक्रमण केलेले आहे. उर्वरित प्रतिवादी देखील दावा मिळकतमध्ये अतिक्रमण करत आहेत. त्यामुळे दावा मिळकतीची व प्रतिवादी यांच्या क्षेत्राची संयुक्त मोजणी करण्यात यावी यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

2. त्यावर प्रतिवादी यांचे वकील यांनी हरकत नोंदवलेली आहे. अतिक्रमण झालेले आहे किंवा नाही याची निश्चीत माहिती नसताना हा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

3. वादी यांचे वकील यांनी असे नमुद केले की, वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 5 यांचे संपुर्ण क्षेत्राची मोजणी फी भरण्यास ते तयार आहेत. असे झाले तर वादी व प्रतिवादी यांचेतील वाद विषयाचे कायमस्वरूपी निराकरण होण्यासाठी सदर मोजणी फलदायी ठरेल. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

1. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
2. तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, रेणापूर यांनी वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 5 यांच्या मिळकतीची मोजणी करून त्याबाबतचा अहवाल या न्यायालयामध्ये दोन महिन्यांचे आत दाखल करावा.
3. मोजणीसाठीची संपूर्ण फी वादी यांनी त्वरीत परस्पर तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, रेणापूर यांचे कार्यालयात जमा करावी.

**दिनांक 08.02.2017**

**( श्रीकृष्ण ह. इनामदार )**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रेणापूर**